**L.A. BILL No. LIV OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR EXTENSION OF A PERIOD FOR SUBMITTING VALIDITY CERTIFICATE BY PERSONS ELECTED ON RESERVED SEATS OF MEMBER, SARPANCH, COUNCILLOR, PRESIDENT AND MEMBER AND CHAIRMAN IN CERTAIN GENERAL OR BYE-ELECTIONS TO VILLAGE PANCHAYATS, ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४.**

**ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांमध्ये सदस्याच्या, सरपंचाच्या, सभासदाच्या, अध्यक्षाच्या आणि सदस्याच्या व सभापतीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या व्यक्तींनी वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत वाढविण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांमध्ये सदस्याच्या, सरपंचाच्या, सभासदाच्या, अध्यक्षाच्या आणि सदस्याच्या व सभापतीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या व्यक्तींनी वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत वाढविणे आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट वाटले ;



एचबी ४९०-१

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, कायदा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी, महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ; (२०२५ चा महा. अध्या. ३.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमामध्ये वापरलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील. (१९५९ चा ३. १९६२ चा महा.५.)

वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत वाढविणे.

**३.** (१) महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अधिनियम, २०२३ याच्या कलम ३ मध्ये आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची कलमे १०-१क व ३०-१क आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याची कलमे १२क, ४२ व ६७ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापर्यंत घेण्यात आलेल्या ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुका ज्या व्यक्तीने लढविली असेल,— (२०२३ चा महा. ३५. १९५९ चा ३. १९६२ चा महा.५.)

(क) तीने, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, आणि ती, ग्रामपंचायतीच्या सदस्याच्या किंवा सरपंचाच्या, जिल्हा परिषदेच्या सभासदाच्या किंवा अध्यक्षाच्या अथवा पंचायत समितीच्या सदस्याच्या किंवा सभापतीच्या राखीव जागेवर निवडून आलेली असेल, परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास तिचा अर्ज पडताळणी समितीसमोर प्रलंबित असेल, अशी व्यक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, तिचे वैधता प्रमाणपत्र सादर करील; आणि

(ख) वर नमूद केलेल्या कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याबद्दल, तीची निवड रद्द करण्यात आली आहे किंवा रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात आले आहे ती व्यक्ती, अथवा ग्रामपंचायतीचा सदस्य किंवा सरपंच, जिल्हा परिषदेचा सभासद किंवा अध्यक्ष किंवा पंचायत समितीचा सदस्य किंवा सभापती असण्यासाठी निरर्ह ठरलेली आहे ती व्यक्ती, ग्रामपंचायतीचा सदस्य किंवा सरपंच, जिल्हा परिषदेचा सभासद किंवा अध्यक्ष, किंवा यथास्थिति, पंचायत समितीचा सदस्य किंवा सभापती असल्याचे मानण्यात येईल आणि असा सदस्य किंवा सरपंच, सभासद किंवा अध्यक्ष, सदस्य किंवा सभापती म्हणून नियमित असेल आणि वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याबद्दल या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीपर्यंत ती व्यक्ती निरर्ह ठरणार नाही :

परंतु, जर अशा व्यक्तीने, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवडणूक, भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, ग्रामपंचायतीचा सदस्य किंवा सरपंच, जिल्हा परिषदेचा सभासद किंवा अध्यक्ष अथवा पंचायत समितीचा सदस्य किंवा सभापती असण्यास निरर्ह ठरेल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी पुढील बाबतीत लागू असणार नाहीत :—

(क) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जागांवर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पोट-निवडणुका घेण्यात आलेल्या असतील; किंवा

(ख) ज्या सदस्याचा वैधता प्रमाणपत्राचा अर्ज, पडताळणी समितीकडून फेटाळण्यात आलेला असेल.

कायदेशीर कार्यवाह्या समाप्त होणे.

**४.** या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी, वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या सदस्याच्या किंवा सरपंचाच्या, जिल्हा परिषदेच्या सभासदाच्या किंवा अध्यक्षाच्या अथवा पंचायत समितीच्या सदस्याच्या किंवा सभापतीच्या निरर्हतेशी संबंधित असणाऱ्या, कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकरणासमोर प्रलंबित असणाऱ्या सर्व कायदेशीर कार्यवाह्या, या अधिनियमान्वये वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत वाढवून देण्यात आलेली आहे त्याबाबतीत, समाप्त होतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून एक वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२५ चा महा. अध्या. ३

**६.** (१) महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ४९०-२ (१०४५-६-२०२५)

ɣ

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याची कलमे १०-१क व ३०-१क आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याची कलमे १२क, ४२ व ६७ यांमध्ये अशी तरतूद आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी राखीव असलेल्या, ग्रामपंचायतीच्या सदस्याच्या किंवा सरपंचाच्या, जिल्हा परिषदेच्या सभासदाच्या किंवा अध्यक्षाच्या अथवा पंचायत समितीच्या सदस्याच्या किंवा सभापतीच्या जागेवर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील.

२. विवक्षित सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांमध्ये अशा राखीव जागांवर निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या आणि वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेल्या व्यक्तींना, ज्या दिनांकास त्या निवडून आल्याचे घोषित करण्यात आले होते, त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आत, वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची परवानगी देण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमांच्या उपरोल्लिखित कलमांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

३. पडताळणी समित्यांवर जात प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या कामाचा अतिभार असल्याने, उक्त अधिनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत, पडताळणी समित्यांकडून वैधता प्रमाणपत्रे मिळविताना निवडून आलेल्या सदस्यांना अडचणींना सामोरे जावे लागत होते. म्हणून वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची उक्त मुदत, महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अधिनियम, २०२३ (२०२३ चा महा. ३५) याद्वारे, बारा महिन्यांकरिता वाढविण्यात आली होती. तथापि, राखीव जागांवर निवडून आलेल्या काही उमेदवारांना, वाढीव मुदतीत वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली नव्हती.

अशा निवडून आलेल्या सदस्यांचे अर्ज, पडताळणी समित्यांसमोर अजूनही प्रलंबित आहेत. तथापि, यथोचितरीत्या निवडून आलेल्या अशा सदस्यांचे अर्ज, पडताळणी समितीसमोर प्रलंबित असल्यामुळे, त्यांची स्वतःची कोणतीही चूक नसताना, अकरा हजारांपेक्षा अधिक सदस्य, वैधता प्रमाणपत्रे सादर न केल्यामुळे, निरर्ह ठरलेले होते किंवा निरर्ह ठरू शकले असते. तसेच, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होत होता. म्हणून, अशा निवडून आलेल्या उमेदवारांना, त्यांचे अर्ज, पडताळणी समित्यांकडे अजूनही प्रलंबित असताना, केवळ जात पडताळणी समित्यांकडून वेळेत वैधता प्रमाणपत्रे देण्यात न आल्याच्या कारणावरून, अशी पदे धारण करण्यापासून वंचित केले जाणार नाही याची सुनिश्चिती करणे आवश्यक होते.

४. म्हणून, ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांमध्ये सदस्याच्या, सरपंचाच्या, सभासदाच्या, अध्यक्षाच्या आणि सदस्याच्या व सभापतीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या व्यक्तींनी वैधता प्रमाणपत्रे सादर करण्याच्या, मुदतीमध्ये बारा महिन्यांची वाढ करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा करणे इष्ट वाटले.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५, रोजी, महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे अध्यादेश, २०२५ (सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३), हा प्रख्यापित केला होता.

६. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ११ जून, २०२५.

**जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ५.—** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणताही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण **शासकीय राजपत्रात** प्रसिद्धी केलेल्या आदेशाद्वारे, दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर उल्लेखिलेला प्रस्ताव हा सामान्य स्वरूपाचा आहे.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४.]**

**[ ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांमध्ये सदस्याच्या, सरपंचाच्या, सभासदाच्या, अध्यक्षाच्या आणि सदस्याच्या व सभापतीच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या व्यक्तींनी वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत वाढविण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.